Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed


**Multidisciplinary International Research Journal**

July -2022

(CCCLVI ) 356





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 18 | साम्राज्यवादी इतिहासलेखन प्रवाह डॉ. अनंत आ. रिंढे | 83 |
| 19 | 'सामंजस्य करारनामा' आणि भारतीय सार्वजनिक उपक्रम डॉ. बाळासाहेब निर्मळ | 86 |
| 20 | राष्ट्रपती प्रतिभा पाटील व्यक्ति आणि कार्य : विश्लेषणात्मक अभ्यास प्रा.डॉ. माधव.शं. वाघमारे | 90 |
| 21 | 'यशोधरा' कादंबरीने बौद्धविचाराला दिलेली गतिमानता प्रा. डॉ. पुरूषोत्तम नंदेश्वर | 93 |
| 22 | भारतीय राज्यघटना निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान व विचार – एक राजकीय अध्ययन नितीन तुळशीराम सडमाके | 99 |
| 23 | भारतातील महिला चळवळीसमोरील आव्हाने प्रा. डॉ. सौ. सुनिता एस.राठोड | 103 |
| 24 | प्राचीन भारतातील कायदा व न्यायव्यवस्था प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी | 108 |
| 25 | कर्नाटकातील निवडक वीरगळ : शिमोगा जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी-देशमुख | 112 |
| 26 | होलार जातीची शैक्षणिक, आर्थिक स्थिती आणि संघटनात्मक परिवर्तनाचा अभ्यास नितीन गुलाबराव पाटील , प्रा. डॉ. सुधाकर लोटन जाधव | 118 |
| 27 | आव्हानांच्या विळख्यातील आधुनिक भारतीय लोकशाही विक्की अशोक रामटेके | 122 |
| 28 | पर्यावरणासाठी जनजागृतीची आवश्यकता प्रा.शशिकांत पी. दुपारे | 128 |
| 29 | अण्णा हजारेंनी भ्रष्टाचार निर्मूलनासाठी राज्यशासना विरूध्द केलेली आंदोलने देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 131 |
| 30 | भारतीय शेतीचे बदलते स्वरूप प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर | 139 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, 356 (CCCLVI ) A
ISSN : 2278-9308
July 2022

# "कर्नाटकातील निवडक वीरगळ : शिमोगा जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह"

**प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी-देशमुख**
इतिहास विभाग प्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद
E-mail - jayshree.jayant@gmail.com,संपर्क - ९६७३४८७७११

• **प्रास्ताविक :-** भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून विविध रुपामध्ये स्मारकशिळा उभारण्याची पध्दती अस्तित्वात असलेली दिसते. त्यामुळे भारताच्या विविध प्रांतांमध्ये विपूल प्रमाणात स्मारकशिळा वा वीरगळ आढळून येतात. त्यातही कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र प्रदेशात त्यांचे अस्तित्व सार्वत्रिक व व्यापक प्रमाणात आढळते. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हा व परिसरातील वीरगळांवर संशोधन करीत असताना भारतातील सर्वच राज्यांमधील वीरगळ, त्यावरील संशोधनात्मक लेखन वाचनात आले. महाराष्ट्राचे शेजारी राज्य कर्नाटकातील वीरगळ प्रत्यक्ष तसेच संशोधन ग्रंथातून वा इंटरनेटवरुन पाहण्यात आल्या. तेव्हा कर्नाटकातील काही निवडक वीरगळांवर, त्यांच्या वेगळेपणावर लेखन करावेसे वाटले. त्यामुळे कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यातील उपलब्ध निवडक वीरगळांवर हा शोधनिबंध सादर करीत आहे.

• **उद्देश :-** वीरगळ हे दुर्लक्षित, तरी स्थानिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण, भौतिक वा प्राथमिक साधन असून जतनाविना नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, गैरसमजाचा बळी ठरत आहे. त्यामुळे या समकालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासाच्या साक्षीदार असलेल्या वीरगळांवर सर्वसमावेशक संशोधन होणे गरजेचे आहे. कर्नाटकातील एकमेवाद्वितीय अशा वीरगळांची भव्यता, कलाकुसर, विविधता, वेगळेपणा व त्यावरील प्रतिके-चिन्हांकने यांचा बारकाव्याने व विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा या शोधप्रपंचामागील उद्देश आहे.

• **संशोधनपध्दती :-** क्षेत्रसर्वेक्षण, छायाचित्रण, अभ्यासकांशी चर्चा, संदर्भसाधनांचा वसंदर्भग्रंथांचा वापर, इंटरनेटचा वापर (मर्यादित).

• **महत्वपूर्ण शब्द :-** वीरगळ, कांदळ, वीरकल्लू, शिमोगा जिल्हा.

• **भौगोलिक स्थान :-** कर्नाटकाच्या पश्चिम भागात बंगळूर या प्रशासकीय विभागात शिमोगा जिल्हा असून त्याचे क्षेत्रफळ ८,४९५ चौरस किलोमीटर इतके आहे. सह्याद्रीच्या/मालनाडच्या बहुतेक भागात पसरलेला हा जिल्हा १३.२७° ते १४.३९° अक्षांश, तर ७४.३८° ते ७६.०४° रेखांशामध्ये आहे.[१]

• 'शिमोगा म्हणजे शिवाचे मुख' असा अर्थ होतो, या वरून या जिल्ह्याचे नाव पडले असावे.[२]

• **विषय मांडणी :-**

१) वीरगळ : संकल्पना, व्याख्या - वीरगळ म्हणजे युध्दात, धर्म-देश-ग्राम-समाज-पशुधन-संस्कृती संरक्षणार्थ धारातिर्थी पडलेल्या वीरांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेली स्मारकशिळा होय. भारताच्या इतिहासात प्राचीन काळापासून अशा स्मारकशिळा उभारल्याची उदाहरणे मिळतात. सातवाहन काळात नाणेघाट येथे अशा प्रतिमागृहाची निर्मिती झाली. तेथील प्रतिमांवर सिमुख सातवाहन, नागनिका, श्रीसातकर्णि इत्यादि नावे आढळतात. असेच प्रतिमागृह कुषाण सम्राट कनिष्कच्या काळात मथुरेजवळ माट येथे निर्माण करण्यात आले होते.[३] भासाच्या 'प्रतिमा' नाटकावरुन स्पष्ट दिसते की, विशेष व्यक्तीच्या निधनानंतर अशा प्रकारची स्मारके उभारण्याची प्रथा होती.[४]अशा प्रकारच्या स्मृतीस्तंभांना छायास्तंभ किंवा 'यष्टि' म्हटलेले आढळते. मनुस्मृतीमध्ये यष्टिचा नाश केल्यास दण्डाची शिक्षा सुचविली आहे.[५]

महाराष्ट्रामध्ये आढळणाऱ्या वीरगळांचा इतिहास सातवाहन काळापर्यंत मागे जाऊ शकेल. पण कर्नाटकातील वीरगळांचा इतिहास त्याहूनही जुना आहे. कारण वीरगळ/वीरकल्लू हा शब्दच मूलत: कन्नड भाषिक आहे. कर्नाटकात त्याला कांदळ असेही म्हटले जाते.[६] वीरगळ म्हणजे वीर स्त्री-पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला दगडाचा, क्वचित लाकडाचा स्तंभ होय. वीरगळ किंवा वीरकल्लू म्हणजेच वीराचा दगड. यातील वीर हा शब्द संस्कृत असून त्याचा अर्थ योध्दा किंवा मोठया माणसाची मरणोत्तर दशा असा होतो.[७] तर कल्लू हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ शिल्प अथवा शीळा असा होतो.[८] अशा या वीरगळास मल्याळी भाषेत तर्रा, गोंडवनात शिणोली, गुजरात मध्ये पालिया, तर उत्तर भारतात वीरब्रह्म असे म्हणतात.[९] नामोल्लेख काही असो, निर्मिती मागील भूमिका एकच ती म्हणजे देशकार्यासाठी मृत पावलेल्या वीराची पूजा वा स्मरण करणे!

२) वीरगळाचे स्वरुप व प्रकार : प्रामुख्याने बेसॉल्ट खडकात किंवा प्रदेशानुरुप उपलब्ध होणाऱ्या टणक दगडामध्ये घडवलेल्या वीरगळी प्रदेशानुरुप व तेथील कला व आर्थिक ऊर्जितावस्थेनुरुप कमी-जास्त आकार व उंचीच्या, उभट आयताकृती शीळेवर तीन (बहुतांशी) वा त्याहून अधिक टप्प्यात कोरलेल्या आढळतात. कर्नाटकात त्या वैविध्यपूर्ण, अधिक विशाल, कलाकुसरयुक्त, अधिक कप्प्याच्या असलेल्या आढळतात. प्रामुख्याने खालच्या कप्प्यात वीराचे वेगवेगळ्या पध्दतीचे वीरमरण, वरच्या कप्प्यात वीराचे अप्सरांसह स्वर्गारोहण, तर तिसऱ्या कप्प्यात त्या वीराचे आराध्य दैवताचे पूजन शिल्पांकित केलेले असते. काही ठिकाणी सर्वात खालच्या कप्प्यात युध्दाची रणदुंदुभी, वा अग्निप्रज्वलन, दुसऱ्या कप्प्यात युध्द, तिसऱ्या कप्प्यात वीराचे व्यक्तिगत वा सहचारिणीसह स्वर्गारोहण, चौथ्या कप्प्यात स्वर्गात नृत्यगायनासह वीराचे स्वागत, पाचव्या कप्प्यात आराध्य दैवताचे वीराकडून पूजन असेही शिल्पांकन असते. बहुतेक वीरगळात आराध्य दैवतामध्ये शिवाला लिंगस्वरुपात पूजलेले दिसते. वीरगळाचे वरचे टोक बहुधा निमुळते, काही ठिकाणी गोलाकार असून त्यावर मंदिराच्या शिखरासारखी रचना कलश-नारळ, व्यालशिल्पे व इतर पशू अंकित असतात.

प्रकार : वीरगळाचे त्याच्या स्वरुप वा रचनेवरुन दोनच प्रकार पडतात. ते म्हणजे चार बाजूने कोरलेली स्तंभ वीरगळ आणि शीळेच्या एकाच बाजूने कोरलेली आयताकृती वीरगळ. तर वीरगतीच्या कारणावरुन मात्र वीरगळाचे अनेक प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे

(१) युध्दनिदर्शक वीरगळ (पायदळ युध्दनिदर्शक, अश्वदल युध्दनिदर्शक, गजदल युध्दनिदर्शक, नौकायुध्द निदर्शक, भालायुध्द निदर्शक, धनुर्धारी युध्दनिदर्शक, किल्लेनिदर्शक, लाठीयुध्द निदर्शक, रथयुध्द निदर्शक, व्दंव्दयुध्द निदर्शक, चौर्ययुध्द निदर्शक, स्त्री योध्दा निदर्शक, स्त्री-पुरुष व्दंव्दनिदर्शक, सेनानायक/दंडनायक निदर्शक, व्याघ्रगळ, सिंहगळ इत्यादि)

(२) बलिदान व आत्मबलिदान निदर्शक वीरगळ

(३) पशुधन रक्षण/गोवर्धन/गोधनरक्षण निदर्शक वीरगळ

(४) पशुहल्ला निदर्शक वीरगळ

(५) पशुनिदर्शक वीरगळ

(६) डोली निदर्शक वीरगळ

(७) मातृस्मृती निदर्शक वीरगळ

(८) व्यापार निदर्शक वीरगळ

(९) शिकार निदर्शक वीरगळ

(१०) उपासक/योगी/साधू निदर्शक वीरगळ इत्यादि[१०]

३) शिमोगा जिल्ह्यातील वीरगळ : शिमोगा जिल्ह्यात वीरगळ मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात. पण त्यातील वैशिष्टयपूर्ण व निवडक वीरगळांची इथे सविस्तर मांडणी करता येईल. इतर सामान्यत: एकाच स्वरुपाच्या असणाऱ्या आणि भारताच्या इतर प्रांतातही बाहुल्याने सापडणाऱ्या वीरगळांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या वीरगळांचीच निवड येथे करण्यात आली आहे. यातील बहुतांश वीरगळ आता बेंगलोर वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या आहेत.

a) किल्ल्यावरील हल्ला निदर्शक वीरगळ : भारतभरात असो वा कर्नाटकात, जास्तीत जास्त वीरगळ या युध्दनिदर्शक वीरगळ आहेत. पण त्यात दुर्गयुध्द किंवा किल्ल्यावरील हल्ला निदर्शक वीरगळ कमी प्रमाणात आहेत. शिमोगा जिल्ह्यात मात्र अशा प्रकारच्या बऱ्याच वीरगळ सापडल्या आहेत. या वीरगळांमध्ये किल्ल्याच्या तटबंदीच्या भिंतीवरील, बुरुजावरील ठराविक नक्षी, ही अवर्जून ते युध्द किल्ल्यावरील आहे, हे दर्शविण्यासाठी दर्शविलेली दिसते. अव्वलूर, मावली, हमसाभावी इत्यादी ठिकाणी याप्रकारच्या वीरगळ सापडतात. त्यातील पहिल्या तीन वीरगळामध्ये किल्ल्यावर झालेल्या अश्वदल व पायदळाच्या आक्रमणापासून किल्ल्यातील स्त्रीया, पशुधन यांचे रक्षण धनुष्यबाण व तलवार यांच्या सहाय्याने करणारे व या युध्दात धाराशयी पडलेले वीर चित्रित केलेले आहेत. तर दुसऱ्या वीरगळात भालाधाऱ्यांच्या आक्रमणापासून किल्ल्याचे रक्षण करणाऱ्या वीरांचे चित्रण केलेले आहे. तिसऱ्या वीरगळामध्ये खालच्या कप्प्यात किल्ल्याच्या बाहेरील अश्वलदयुध्द आणि किल्ल्याच्या तटबंदीवरील हातघाईची लढाई दर्शविली आहे. इतर दोन वीरगळांमध्येही किल्ल्यावर झालेल्या आक्रमणाचा प्रतिकार करणारे वीरयोध्दे आणि त्यांच्या पायाशी वीरगतीस प्राप्त झालेल्या योध्याचे कलेवर दर्शविले आहे. या प्रकारातील सर्व वीरगळांमध्ये परस्पर विरोधी दोन्ही पक्षातील योध्दागटाचे वेगळेपण दाखविण्यासाठी त्यांच्या केशरचना, पेहेराव, शस्त्रास्त्रे, त्यावरील नक्षी, ध्वज, युध्दवाद्ये, डोक्यावरील शिरस्त्राणे अथवा पगडया यामधील फरक बारकाव्याने दर्शविला आहे.

b) उरालीवू/ग्रामसंरक्षण व सीमासंरक्षण (गदी कलागा) निदर्शक वीरगळ : या प्रकारच्या वीरगळ सर्वात जास्त प्रमाणात देशभर सापडणाऱ्या वीरगळ आहेत. शिमोगा जिल्ह्यात अब्बालुरु, चिक्कमन्नूर, गुलबार, हस्सान, हळेबीड,

लक्कुंदी, तिलवल्ली याठिकाणी ग्रामरक्षक प्रकारातील वैशिष्ट्यपूर्ण वीरगळ सापडतात. या वीरगळांवरील स्त्री-पुरुषांच्या केशरचना, वस्त्रालंकार सुशोभिकरण, शस्त्रांवरील नक्षीकामातील बारकावे, पदलालित्य, शरीराचा बांधेसूदपणा, पशुधन वा अश्व, गजदलातील प्राण्यांच्या हालचाली, सेनानायक-सैन्य, हत्तीवरील वा घोडयावरील स्वार यांच्यातील फरक हे बारकावे वाखाणण्यासारखे आहेत. यामध्ये एकावेळी अनेक बाणांचा वर्षाव करणारा धनुर्धारी, ग्रामरक्षणार्थ युध्दात बलीदान पावलेली धेनू वा प्राणी दर्शविणाऱ्या वीरगळ विरळाच आहेत. पालखीतून वीरास स्वर्गात नेणाऱ्या अप्सरांचे नृत्य, शिवगण, नंदी, शिवलिंगाचे पूजन करणारा वीर, अथवा शिवलिंग यातील विविधता देखील लक्षणीय आहे.

c) पशुधन संरक्षण निदर्शक वीरगळ : ग्रामरक्षणाचाच महत्त्वाचा भाग म्हणजे पशुधन संरक्षण प्राचीन व मध्ययुगात शेतीप्रधान भारतात शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशूपालनास महत्त्व प्राप्त झालेले दिसते. पर्यायाने पशुधन रक्षणासाठी बलिदानकर्त्या वीराचेही महत्त्व वाढलेले दिसते. पशुधन करणाऱ्या चौर्य करणाऱ्या टोळ्या किंवा हिंस्त्र पशूंच्या हल्ल्याला परतवणाऱ्या वीरांचे अंकन अशा वीरगळांवर केलेले दिसून येते. पशुधनामध्ये गायी, वासरे, बैल प्रामुख्याने दर्शविलेले असतात. बल्लगवी, हस्सान, कोडीकोंकोप्पारोना इत्यादी ठिकाणी पशुधन संरक्षण निदर्शक वीरगळ विपुल प्रमाणात सापडतात. या वीरगळांवर गाईंची शिंगे, कास, वासरे, बैलांची बलस्थाने, वशिंडे, गळ्याची पोळी, सैरावैरा उधळलेल्या पशूंच्या उभारलेल्या शेपटया यांचे जिवंत आरेखन केलेले दिसते.

d) स्त्रीरक्षण निदर्शक वीरगळ (पेनबुय्याल) : हा महाराष्ट्रात खूप विरळ तर कर्नाटकात काही प्रमाणात सापडणारा वीरगळाचा प्रकार होय. एखाद्या स्त्रीच्या शीलाचे शत्रूपासून रक्षण करत असताना मृत्यू आलेल्या वीराच्या स्मरणार्थ उभारलेल्या वीरगळावर खालच्या कप्प्यात स्त्रीसुलभ शरीरलक्षणे उठावदारपणे दाखविलेली स्त्रीचे किंवा स्त्रीयांचे शिल्प, त्यांच्या समोर ठामपणे उभा राहून त्यांच्या शिलाचे शत्रूपासून रक्षण करणार वीर असे शिल्पांकन केलेले दिसते. काही वेळा स्त्रीया आणि पशुधन यांचे एकत्रितपणे रक्षणदर्शक वीरगळही आढळून येतात. शिमोगा जिल्ह्यात अशाप्रकारच्या ३ वैशिष्ट्यपूर्ण व अखंड अशा ३ वीरगळ आढळल्या आहेत. स्त्रीदाक्षिण्य, स्त्रीच्या शिलास सामाजिक प्रतिष्ठेचे रुप मानण्याची मानसिकता या गोष्टी यातून प्रतीत होतात. या तीनही वीरगळ कलापूर्ण, वैविध्यपुर्ण आहेत.

e) हिंस्त्र पशुहल्ला निदर्शक वीरगळ : हिंस्त्र पशूंचा हल्ला परतवून लावताना वा त्याची शिकार करताना धारातीर्थी पडलेल्या वीराच्या स्मरणार्थ उभारलेल्या या वीरगळ प्रकारात खालच्या थरात तो विशिष्ट पशू अथवा पशुसमूह आणि त्याच्याशी लढणारा योध्दा किंवा अनेक योध्दे दर्शविलेले असतात. काहीवेळा योध्दयासोबत त्याचे शिकारी कुत्रेही शिल्पित केलेले असतात. त्यामुळे स्वर्गारोहणाच्या थरात काहीवेळा वीरगतीस प्राप्त झालेले पाळीव प्राणीही दर्शविलेले दिसतात. अल्दागिरी, अम्बाले, बागाली, बाल्लीगावी, होसूर, मुदूदायरसी इत्यादि गावी सापडणाऱ्या पशुहल्ला निदर्शक वीरगळांमध्ये डुक्कर, वाघ, सिंह, हत्ती, जंगली कुत्रे इ. पशूंचा हल्ला निर्देशित केला आहे. बहुतेक तीन तर क्वचित चार कप्प्याच्या असणाऱ्या या वीरगळांवरील सर्व आकृतींची शिल्पांकने, कोरीव, आकारबध्द, आखीव-रेखीव व कलापूर्ण असलेली दिसतात.

f) आत्मदहननिदर्शक वीरगळ (मस्तीकल्लू/वीरमस्ती) : या प्रकारात सतीगळ किंवा सतीशिळांचाही समावेश होतो. अशा प्रकारच्या स्मारकशिळा गावाच्या समाजाच्या व देशाच्या हिताच्या किंवा धार्मिक/सांस्कृतिक कारणासाठी आत्मबलिदान/चितेमध्ये आत्मदहन करणाऱ्या स्त्रीच्या स्मृत्यर्थ उभारल्या जातात. पतीमरणाच्या वार्तेने चितेमध्ये प्रवेश करुन आत्मदहन करणारी स्त्री/स्त्रीयांचे शिल्पांकन यामध्ये शिल्पांकित केलेले असते. या प्रकारच्या वीरगळात खालच्या कप्प्यात त्या स्त्रीची पालखीतून वाद्यांच्या गजरात मिरवणूक, तर दुसऱ्या कप्प्यात त्यांचे आत्मदहन दर्शविलेले असते. शिमोगा जिल्ह्यातील केवळ अक्कीवल्ली देकब्बे या ठिकाणीच अशा वीरगळ आढळतात, तर सतीशिळाही फारशा आढळत नाहीत. यातील देकब्बे येथील स्मारकशिळा खूपच वैशिष्टयपूर्ण आहे. पाच कप्प्याच्या या वीरगळामध्ये सर्वात खालच्या कप्प्यात विधिवत आत्मदहन करावयास निघालेली वस्त्रालंकृत स्त्री, तिला पालखीतून नेणारे आणि विविध वाद्ये वाजवणारे वाजंत्री यांची मिरवणूक, तर दुसऱ्या कप्प्यात या सर्वांच्या उपस्थितीत चितेमध्ये प्रवेश करणारी स्त्री शिल्पांकित केली आहे. तिसऱ्या कप्प्यात वाद्यांच्या गजरात, शुभ चिन्हांसह छत्र व पालखीसह स्वर्गारोहण करणारी वीरांना दर्शविली आहे. यातील सर्वात वरचा कप्पा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामध्ये डाव्या बाजूने क्रमाने चतुर्मख ब्रह्मा (हंसवाहन, चतुर्भुज, माळा, स्त्रुक, दंड, कमंडलूधारी),[११]विष्णू (शंख, चक्र, पद्म, गदा)[१२]लक्ष्मी यांच्या सोबत संपूर्ण शिवपरिवार (छत्रधारी) आहे. शिवपरिवारामध्ये मध्यभागी चतुर्भुज शिव (अक्षमाळा, परशू, नाग, घट, जटामुकूट),[१३]पार्वती, पायाशी नंदी, पार्वतीच्या डाव्या हातास गणेश - पायाशी मूषक वाहन, शंकराच्या उजव्या हातास मयूरवाहनधारी कार्तिकेय/स्कंद (त्रिशुळधारी, द्विभूज)[१४]अतिशय आकारबध्दतेने शिल्पांकित केलेले दिसते.

g) सहगमन स्मारक शिळा/सतीशिळा : एखादी स्त्री आपल्या पतीसोबत त्याच्या चितेवर स्वदहन करते म्हणजे सती जाते. अशा सतीचा आशीर्वाद सर्व मानवजातीला लाभतो असा समज समाजात प्रचलित होता. आणि त्या स्त्रीला देवत्व प्राप्त होते, असे मानले जाई. व तिच्या स्मरणार्थ सतीशिळा उभारली जाई.

h) अनुगम/अनुमरण दर्शक स्मृतीशिळा : एखाद्या स्त्रीचा पती दूरस्थ रणांत मरण पावल्याची बातमी कळाल्यावर आपल्या पतीच्या कलेवराशिवायच त्याच्या पादुका व स्मृतीखुणांसह ती स्त्री चितेत प्रवेशल्याचे दर्शविलेली शिळा म्हणजे अनुगमदर्शक स्मृतीशिळा किंवा सतीशिळा होय. (सहगमन व अनुगमन निदर्शक स्मारकशिळा हे सतीनिदर्शक स्मारक शीलांचेच दोन प्रकार आहेत.) देकाब्बे येथील इ.स. १०५७ मधील स्मारकशिळा ज्याचे उत्तम उदाहरण होय. या ५ स्तरातील स्मारकशिळेवर संबंधित अनुगमासंबंधी सविस्तर माहिती सांगणारा शिलालेख देखील आहे.[१५] याव्यतिरिक्त शिलालेखाविरहीत अनुगमनिदर्शक शीळाही अनेक ठिकाणी आढळतात. बहुतेक ठिकाणी आशीर्वाद मुद्रेतील स्त्रीप्रतिमा किंवा नुसताच वरदहस्त आणि वरच्या बाजूस चंद्र-सूर्य कोरलेल्या स्मृतिशिळा, तर काही ठिकाणी एकापेक्षा अधिक स्त्रीयांनी अनुगम केल्याचे दर्शविणाऱ्या स्मृतीशीळाही आढळून येतात.[vi]

i) वीरमस्ती कल्लू म्हणजेच वीर पती-पत्नीचे स्वर्गारोहण दर्शविणारी वीरगळ : यामध्ये वीर पती-पत्नी दोघेही संघर्ष करताना किंवा दोघे मिळून स्वर्गगमन करताना दर्शविलेले असतात. काहीवेळा यामध्ये स्त्रीयांची संख्या एकापेक्षा अधिक दाखविलेली असते.[vii]

j) कीलगुंटे/स्वयंदफन/आत्मबलिदान निदर्शक वीरगळ : अशा प्रकारच्या वीरगळ या जिवंतपणे स्वत:ला दफन करणाऱ्या, आगीत लोटणाऱ्या, मारुन घेणाऱ्या, स्वत:चे आयुष्य संपविणाऱ्या किंवा आपल्या मालकाच्या/राजाच्या मृत्यूनंतर त्याच्यासोबत आपले आयुष्य संपविणाऱ्या व्यक्तीच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेल्या असल्याने त्या त्या प्रसंगाचे प्रत्यक्षदर्शी शिल्पांकन या वीरगळांवर केलेले असते. गावाच्या, समाजाच्या, देशाच्या वा स्वत:च्या राज्याच्या हितासाठी, त्यासंबंधीच्या निष्ठा दर्शविण्यासाठी किंवा धार्मिक-सामाजिक,सांस्कृतिक प्रथा-परंपरांचा भाग म्हणुन त्याकाळात आत्मबलिदान करण्याची संकल्पना रुढ होती, हे यावरुन दिसते. गावावरील दुष्काळ, अतिवृष्टी, परचक्र, रोगराई सारख्या संकटापासून गावाला मुक्त करण्यासाठीही असे आत्मबलिदान स्वेच्छेने व समाज किंवा स्वामी ईच्छेने केले जात असे. या पध्दतीबाबतच्या कागदोपत्री वा शिलालेखातील नोंदी सापडतात. पण अशा प्रकारच्या वीरगळ मात्र क्वचितच पहायला मिळतात. दोड्डाहुंडी येथील या प्रकारातील वीरगळ साधारणत: इ.स. ८४० ते ८६९ या काळातील असावी. यामध्ये पश्चिमी गंग राज एरेगंगा नीतीमात्र याच्या विधीपूर्ण मृत्यूचे शिल्पांकन केलेले आहे. दोड्डाहुंडी (जि. म्हैसूर) आणि हेमावती येथील वीरगळ आत्मबलिदान निदर्शक वीरगळाचे उत्तम उदाहरण होय.[viii]

k) समाधी किंवा सथारण निदर्शक वीरगळ (निसिदी सल्लेखना) - सत् + लेखना या दोन शब्दांपासून सल्लेखना शब्द बनलेला आहे. सल्लेखना ही एक जैन प्रथा असून जैन धर्मीय व्यक्तीने हळूहळू अन्नपाणी ग्रहण त्याग करुन मृत्यूला जवळ करणे असा त्याचा अर्थ आहे. श्रावक आणि मुनी दोघांसाठीही जीवनातील शेवटची मानली जाणारी ही साधना असून जैन ग्रंथ तत्वार्थ सूत्र मधील सातव्या अध्यायातील २२ व्या श्लोकात याची सविस्तर माहिती आली आहे.[१६] (मरणान्तिकी सल्लेखनां जोषित) दिगंबर जैन धर्मग्रंथानुसार या पध्दतीस समाधी वा सल्लेखना म्हणतात, तर श्वेतांबर पंथानुसार याला संथारा असे म्हणतात. अशा प्रकारे सल्लेखनाच्या मार्गाने मृत्यूला जवळ करणाऱ्या जैन श्रावक वा मुनींच्या स्मरणार्थ उभारलेल्या वीरगळास निसिदी सल्लेखना निदर्शक वीरगळ असे म्हटले जाते. दोड्डाहुंडी (म्हैसूर), कर्नाटक येथे अशा प्रकारची दुर्मिळ वीरगळ पहावयास मिळते.[ix]

l) इतर प्रकार : उरी उय्यले म्हणजे धार्मिक विधीतील अग्नीज्वालांवर सूर्यग्रहणाच्या दिवशी स्वत:च्या प्राणांची आहुती देणे होय. अशा अग्निज्वालांवर स्वत:ला टांगून घेतलेल्या या व्यक्तीचे चित्रण काही वीरगळांवर आढळून येते. वीरगळांचा हा प्रकार महाराष्ट्रात आढळत नाही. तर कर्नाटकातही कमी प्रमाणात आढळतो. यावरुन ती प्रथा विशिष्ट समूहात, विशिष्ट प्रदेशापुरती मर्यादित असावी, असे दिसते.[x] याव्यतिरिक्त एखाद्या विशेष, महत्त्वपुर्ण दिवसाच्या मुहुर्तावर एखाद्या धारदार लोखंडी सुळावर वा बाणांवर पडून आपले प्राणार्पण करण्याचीही प्रथा दर्शविणाऱ्या वीरगळ अगदी दुर्मिळ भागात आढळून येतात. ही प्रथा देखील मर्यादित प्रदेश व समूहामध्ये धर्म, संस्कृतीचा एक भाग म्हणून प्रचलित असावी. त्यामुळे या विधीचे दृश्यांकन करणाऱ्या वीरगळही अल्पप्रमाणात व मर्यादित प्रदेशात आढळून येतात.[xi]

- सारांश :- प्राचीन काळापासून भारतभरात आढळून येणाऱ्या वीरगळांची संख्या मध्ययुगात विपुल प्रमाणात आढळून येते. याबाबत सार्वत्रिकता असली तरी या वीरगळांचे जे विविध प्रकार आढळतात, त्यांच्या अस्तित्वाबाबत प्रादेशिक विविधता आढळते. कर्नाटक राज्य याबाबत आपले वेगळेपण जपणारे आहे, हे येथील विविध प्रदेशात सापडणाऱ्या विविधतापूर्ण वीरगळांवरुन सिध्द होते. या वीरगळ त्या-त्या प्रदेशातील सामाजिक, धार्मिक, राजकीय,

आर्थिक, सांस्कृतिक, प्रथापरंपराविषयक व सामाजिक संकल्पना विषयक इतिहासाच्या साक्षीदार आहेत. हे प्राथमिक साधन कर्नाटकातील इतिहासाच्या अज्ञात पानांवर प्रकाश टाकणारे आहे.

- **निष्कर्ष :-**

(१) संबंधित परिसरातील दुर्ग/किल्ल्यांवरील युध्दनिर्दशक वीरगळ, तेथील गडकिल्ल्यांचे अस्तित्व, त्यांचे राजकीय व संरक्षणात्मक महत्त्व दर्शवितात. तर पशुधन संरक्षण निदर्शक, ग्रामसंरक्षण निदर्शक, हिंस्त्रपशू संहारण निदर्शक वीरगळ या शेतीप्रधान समाज व अर्थव्यवस्था, त्याअनुषंगाने पशुधनाच्या रक्षणाचे महत्त्व दर्शवितात.

(२) स्त्री संरक्षक वीरगळांवरुन स्त्रीयांप्रतीची समाजाची दृष्टी, स्त्रीदाक्षिण्य लक्षात येते. तर सतीदर्शक विविध प्रकारच्या वीरगळांमधून सतीपध्दती कर्नाटकात अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले, तरी सतीशीळांचे मर्यादित प्रमाण पाहता तिथे सतीपध्दती ही सक्तीची नसून स्त्रीच्या स्वेच्छेवर अवलंबून होती, असे वाटते. शिवाय सहगमन, अनुगमन, वीर पती-पत्नी निदर्शक वीरगळांमध्ये पुरुषवीरासोबत एकापेक्षा अधिक स्त्रीया स्वर्गारोहण करताना दर्शविलेल्या असल्याने या परिसरात पुरुषप्रधानता व बहुपत्नीत्व पध्दती प्रचलित असल्याचे दिसते.

(३) आत्मदहन, आत्मसमर्पण/आत्मबलिदान, पवित्र अग्नीत प्रवेश, पवित्र विधीच्यावेळी तिक्ष्ण शस्त्रावर देहत्याग इत्यादी दर्शविणाऱ्या वीरगळांमधून प्रादेशिक वेगळेपण सामाजिक विविधतेबरोबरच संस्कृती, प्रथा-परंपरा, धार्मिक विधी, श्रध्दा व संकल्पना यांचा अंदाज येतो. शिवाय स्वप्राणार्पणामागील भूमिकेतून स्वदेश, स्वसमूह, स्वधर्म-संस्कृती व स्वामीनिष्ठा यांबाबतच्या निष्ठांची तीव्रता जाणवते.

(४) सर्वच प्रकारच्या वीरगळांवर अंकित मनुष्याकृतींच्या चित्रणावरुन समकालीन वस्त्रालंकार, वेशभूषा याबरोबरच कलेचा विकास, कलाकारांना मिळणारा राजाश्रय, आर्थिक स्थिती या गोष्टींवर प्रकाश टाकता येतो.

(५) वीरगळांवरील युध्दे, शस्त्रास्त्रे यांच्या शिल्पांकनावरुन तत्कालीन युध्दपध्दती, सैन्यव्यवस्था, शस्त्रास्त्रे यांची माहिती मिळते.

(६) वीरगळांच्या सर्वात वरच्या कप्प्यात मृत वीराचे आराध्य दैवताच्या पूजनाचे चित्रण असते. यावरुन तो वीर कोणत्या धर्म-पंथ-विचारांचा आहे, तेथील समाजाचे आराध्य दैवत कोणते आहे, याविषयी वक्तव्य करता येते. पण महाराष्ट्र असो वा कर्नाटक, बहुसंख्य वीरगळांमध्ये वरच्या कप्प्यात वीराला महादेव/शिवाचे लिंगरुपात पूजन करतानाच दाखविलेले दिसते. जास्ती करुन वीरगळ या मध्ययुगातील आहेत आणि याकाळात बहुतेक समाज शिवपूजक असल्याचे दिसते. महाराष्ट्रात यादवकाळ हा वीरगळांच्या विपूलतेचा कालखंड होता. या काळातील वीरगळांवर शिवलिंगपूजनाचे चित्रण जास्त दिसते. कारण यादव हे शिवपूजक होते.[१७] कर्नाटकातही या काळात बहुसंख्य शिवपूजक होते. १२ व्या शतकातील वीरशैव संप्रदाय तर शिवलिंगपूजकच आहे.

- **तळटीपा :**

१) शिमोगा जिल्हा विकीपीडिया
२) विव्दांस माधव - 'करु या देशाटन' साप्ताहिक लेखनमाला - Best of India.com - २२ऑगस्ट २०२१
३) डॉ. जामखेडकर अ.प्र. -संपा. डॉ. पाठक अ.शं.- महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, प्राचीन काळा खंड-१, भाग-२ - स्थापत्य व कला दर्शनिका विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२००२, मराठी आवृत्ती पृष्ठ क्र. २६७
४) कित्ता
५) कित्ता
६) राजवाडे वि.का. - संकीर्ण निबंध लेखनसंग्रह-भाग-३ -१८५० वरदा बुक्स पुणे - www.sahyadribooks.com - पृष्ठ २४२
७) कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग - मराठी व्युत्पत्तीकोश- ढवळे केशव भिमाजी, मुंबई-१९४६- प्रथमावृत्ती-पृष्ठ क्र. ६६७
८) डॉ. जोशी प्रल्हाद नरहर - आदर्श मराठी शब्दकोश- विदर्भ मराठवाडा बुक्स कंपनी, पुणे-१९९२- तृतीय आवृत्ती- पृष्ठ क्र. १९६९
९) डॉ. कुलकर्णी जयश्री - 'वीरगळ-इतिहासाचे भौतिक साधन : उस्मानाबाद तालुक्याच्या विशेष संदर्भासह' लघुसंशोधन प्रकल्प-२०१७ पृष्ठ क्र. ०९
१०) डॉ. कुलकर्णी जयश्री - 'वीरगळ-इतिहासाचे भौतिक साधन : उस्मानाबाद तालुक्याच्या विशेष संदर्भासह' लघुसंशोधन प्रकल्प-२०१७ पृष्ठ क्र. १५
११) डॉ. जोशी नी. पु. - भारतीय मुर्तीशास्त्र - प्रसाद प्रकाशन, पुणे -२०१३ द्वितीय आवृत्ती-पृष्ठ क्र. ४५
१२) कित्ता - पृष्ठ क्र. ४५
१३) कित्ता - पृष्ठ क्र. १५७
१४) कित्ता - पृष्ठ क्र. ३२७

ISSN : 2278-9308
July 2022

१५) http://karnatakaitihasaacadamy.org
१६) श्री आचार्य उमास्वामी - तत्वार्थसूत्र (सार्थ)- जैन पुस्तक भवन, कलकत्ता- प्रथमावृत्ती - २००७ पृष्ठ ४४
१७) डॉ. जोशी नी. पु. - भारतीय मुर्तीशास्त्र - प्रसाद प्रकाशन, पुणे -२०१३ द्वितीय आवृत्ती-पृष्ठ क्र. १५८

**संदर्भग्रंथ सूची :**

१) वीरगळ एक अभ्यास - डॉ. लता अकलुजकर
२) महाराष्ट्रातील वीरगळ - सदाशिव टेटविलकर
३) सोलापुर जिल्ह्यातील वीरगळांची विविधता - डॉ. संजय वाघमारे
४) संकीर्ण निबंध लेखसंग्रह भाग ३- वि. का. राजवाडे
५) तत्वार्थ सूत्र (सटीक) –सं. रामजी दोषी (हिंदी अनुवाद – पं. परमेष्ठी दास)
६) भारतीय मूर्तीकला- पं. महादेवशास्त्री जोशी
७) The Rashtrakutas and Their Times : Alatekar Anant Sadashiv
८) Singh Upinder - A History of Ancient and Early Medieval India : From the stone age to the 12th Century - India Pearsons Education
९) Memorial Stones of India - Dr. Gunthekar Sonthaymer